## प्लेसमेंट अपडेट–उल्लेखनीय यश आणि प्रशिक्षण उपक्रम




संस्थेच्या प्लेसमेंट सेल मार्फत विद्यार्थ्यांसाठी विविध नामांकित कंपन्यांमध्ये भरतीसाठी संधी उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये यावर्षीचा सर्वात उच्च पॅकेज ₹11.80 लाख वार्षिक असल्याचा विशेष उल्लेख करता येईल, जो संस्थेसाठी अभिमानास्पद आहे. विद्यार्थ्यांना उद्योग स्नेही बनवण्यासाठी Infosys कंपनीच्या वतीने १५ दिवसांचे सखोल प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. याप्रशिक्षणा मध्ये विद्यार्थ्यांना कोडिंग, कम्युनिकेशन स्किल्स, प्रोफेशनल एथिक्स यासारख्या मूलभूत आणि प्रगत कौशल्यांचा अभ्यास करून घेण्यात आला. तसेच IBM कंपनीच्या वतीने ऑन-कॅम्पस ट्रेनिंग वर्कशॉप घेण्यात आले, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना क्लाउड कम्प्युटिंग, डेटा ॲनालिटिक्स, AI आणि सॉफ्टवेअर डेव्हल पमेंट यावर व्यावहारिक मार्गदर्शन मिळाले. या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे कौशल्य विकास आणि नोकरीसाठी तयारी अधिक प्रभावी झाली असून उद्योग विश्वात यशस्वी करिअरसाठी त्यांना सक्षम केले आहे.



## मानवी क्षमता आणि मशीनच्या शक्तीचा संगम: इंडस्ट्री 4.0 ते इंडस्ट्री 5.0

"मानवी क्षमता आणि मशीनच्या शक्तीचा संगम: इंडस्ट्री 4.0 ते इंडस्ट्री 5.0 चा उत्क्रांती प्रवास"या विषयावर एक Faculty Development Programme (FDP) आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश शिक्षकांना मानवी कौशल्ये आणि तंत्रज्ञानातील प्रगती यामधील बदलत्या नात्याबद्दल माहिती देणे, तसेच इंडस्ट्री 4.0 आणि 5.0 संदर्भातील नवीन घडामोडी समजावून देणे हा होता. कार्यक्रमाद्वारे या तंत्रज्ञानामुळे उद्योग क्षेत्रात होणाऱ्या बदलांचा अभ्यास करून शिक्षक त्यांच्या अध्यापन आणि संशोधन कार्यात या संकल्पनांचा प्रभावी समावेश करू शकतील, यावर भर देण्यात आला.हा कार्यक्रम ऑनलाइन Google Meet द्वारे आयोजित करण्यात आला आणि त्यामध्ये एकूण ७० शिक्षकांनी नोंदणी केली होती. संमेलनात आठ तज्ञांनी विविध सत्रे सादर केली, ज्यात इंडस्ट्री 4.0 आणि इंडस्ट्री 5.0 च्या वेगवेगळ्या पैलूंवर सखोल माहिती व मार्गदर्शन दिले गेले.




## वित्तीय व्यवस्थापनावर कार्यशाळा



वित्तीय व्यवस्थापनावर कार्यशाळा – CA अक्षय गाढिया यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या आर्थिक कौशल्यांचा विकास करण्यासाठी CAअक्षय गाढियायांच्या मार्गदर्शनाखाली वित्तीय व्यवस्थापनया विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत त्यांनी आर्थिक नियोजन, बजेटिंग, निधी व्यवस्थापन, गुंतवणूक धोरणे, तसेच आर्थिक जोखमींचे व्यवस्थापन याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

## Budget



संस्थेत C A धरम संखलायांच्या मार्गदर्शनाखाली एकविशेष बजेट सत्रआयोजित करण्यात आले. या सत्राचा उद्देश विद्यार्थ्यांनाभारत सरकारच्या अर्थसंकल्पीय प्रक्रियेबाबत जागरूक करणेआणि त्याचाव्यवसाय, अर्थव्यवस्था व सामान्य जनतेवर होणारा परिणामसमजावून सांगणे हा होता.C A संखला सरांनी विद्यार्थ्यांनाबजेटची रचना, महसूल आणि भांडवली खर्च, कर प्रणालीतील बदल, अर्थव्यवस्थेतील धोरणात्मक निर्णय, तसेचबजेट 2025 मधील महत्त्वाचे ठळक मुद्देसविस्तरपणे समजावले. त्यांनीथेट कर, अप्रत्यक्ष कर, सबसिडी, विकास खर्च, यावरील परिणामांचे विश्लेषण सादर केले.सत्रामध्येकेस स्टडीज आणि इंटरॲक्टिव्ह चर्चाघेण्यात आल्या ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि आपले प्रश्न विचारले.



# IMR CAMPUS

IMR Campus Newsletter Publish by Director : Prof. Dr. B. V. Pawar, Editor: Dr. Dipali Patil,
Editorial committee: Dr. Anilkumar Marthi, Ms. Varsha Zhanke, Dr. Dhanashree Chaudhari, Ms. Yamini Bhatiya
Students Representive : Himani Sharma, Chaitali Sonawane, Himakshi Patil, Rushikesh Bhalerao
This Newsletter Publish for KCES's Institute of Management Research, Jalgaon inhouse use only.

**Institute's Vision:** Committed to provide value based, quality, professional and technical education to the students and empowering them with the reputed skillsets and competencies to face challenges of the fast changing global environment.

**Institute's Mission:** • To provide necessary technical and professional education with a view to uplifting the lives of rural and urban students. • To create conducive platform for students to develop their skills and knowledge. • To encourage innovation and research aptitude among students. • To inculcate global ethics and human values in all the learners.

## KCES's KridaMahotsav 2025 – Winners Candidate




## INTERNATIONAL CONFERENCE ON INNOVATION, AUTOMATION AND FUTURE TRENDS IN BUSINESS INCON-2025





दि. २२ मार्च २०२५ रोजी"नवोपक्रम, ऑटोमेशन आणि व्यवसायातील भविष्यकालीन ट्रेंड्स"या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय संमेलनINCON-2025आयोजित करण्यात आले. सध्याच्या तंत्रज्ञान व ऑटोमेशनच्या वेगवान विकासामुळे उद्योग क्षेत्रामध्ये क्रांतिकारी बदल होत असून, या संमेलनाचा मुख्य उद्देश संशोधक, उद्योगतज्ञ व नवप्रवर्तनशील व्यक्तींना एकत्र आणून या क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञानावर आणि GPT-आधारित AI उपायांवर चर्चा करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे होता. कार्यक्रमाचा उद्घाटन सन्माननीय मुख्य अतिथी प्रा. शिल्पा बेंडले यांच्या उपस्थितीत पार पडला, ज्यांनी उद्योगातील ऑटोमेशन आणि AI च्या नवकल्पनांवर प्रकाश टाकला. प्रा. बी. व्ही. पवार यांनी अध्यक्षत्व करत आयोजन समिती आणि सहभागी संशोधकांचे कौतुक केले. मुख्य भाषण प्रो. पी. एस. हिरेमठ यांनी दिले, ज्यामध्ये त्यांनी आर्टिफिशियल न्यूरल नेटवर्क, डीप लर्निंग, OpenAIव जनरेटिव्ह AI सारख्या तंत्रज्ञानांची सखोल माहिती दिली. दुपारी डॉ. माया इंगळे आणि प्रा. अनिल डोंगरे यांनी AI च्या दैनंदिन वापराचे फायदे-तोटे व नव्या व्यवसाय संधी यावर मार्गदर्शन केले. संमेलनात ६७ संशोधक सहभागी झाले आणि पाच समांतर तांत्रिक सत्रांत ५० पेपर सादर झाले. डॉ. वर्षा पाठक, डॉ. ममता दाहाड व डॉ. अनुपमा चौधरी यांनी आयोजन समितीचे नेतृत्व केले, तर प्रो. अनिलकुमार मारठी यांनी सत्रांचे यशस्वी समन्वय साधला. INCON-2025 ने तंत्रज्ञान व ऑटोमेशन क्षेत्रातील जागतिक ट्रेंड्सवर सखोल संवाद साधत उद्योगविश्वाला पुढे नेण्यास महत्त्वपूर्ण योगदान दिले

## इंडस्ट्रियल व्हिजिट : गांधी तीर्थ आणि जैन व्हॅली





संस्थेतील सामाजिक जबाबदारीच्या अंतर्गत विद्यार्थ्यां आणि प्राध्यापकांच्या सक्रिय सहभागाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले.

## सायबर सुरक्षा





विद्यार्थ्यांच्या तांत्रिक ज्ञानात भर घालण्यासाठी "सायबर सुरक्षा" या महत्त्वाच्या विषयावर एक अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.  हे व्याख्यानसायबर सुरक्षा तज्ञ मिस कविता दातारयांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. त्यांनी सायबर सुरक्षेचे मूलभूत तत्त्व, सध्याचे सायबर धोके, फिशिंग, डेटा चोरी, पासवर्ड सुरक्षा, सोशल मीडिया सुरक्षितता याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांनाईमेल सुरक्षा, सुरक्षित ब्राउझिंग, मलवेअरपासून संरक्षणया बाबींबाबत जागरूकता दिली. प्रश्नोत्तर सत्रात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला व त्यांचे शंका समाधानही करण्यात आले. हे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरले व त्यांना डिजिटल दुनियेत सुरक्षिततेचा भान मिळवण्यासाठी नवे दृष्टीकोन प्राप्त झाले.

## Manager's Day 2025

इन्स्टिट्यूट मध्ये "Manager's Day 2025"हा दिवस विद्यार्थ्यांच्याव्यवस्थापन कौशल्यांचा विकास आणि उद्योग जगतातील दृष्टीकोन समजून घेण्यासाठी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रख्यात उद्योग सल्लागार श्री. भूषण बाविस्कर यांच्या हस्ते झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना व्यवस्थापनातील व्यावहारिक अडचणी, नेतृत्वगुण व निर्णयक्षमतेचे महत्त्वयावर मार्गदर्शन केले.
कार्यक्रमात विविध गुणवत्तावर्धक स्पर्धा आणि उपक्रम घेण्यात आले, ज्यामध्ये:

- व्यवस्थापन विषयक क्विझ स्पर्धा
- केस स्टडी प्रेझेंटेशन, ज्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध उद्योग समस्यांवर उपाय मांडले
- मॅनेजमेंट गेम्स, ज्यामुळे नेतृत्व, गटकार्य आणि वेळ व्यवस्थापन यासारख्या कौशल्यांचा विकास झाला




## IT Festa 2025



IT FESTA 2025 – राष्ट्रीयस्तरा वरील दोन दिवसीय महोत्सव
कॉम्प्युटर अप्लिकेशन विभागाच्या वतीने 28 फेब्रुवारी व 1 मार्च 2025 रोजी राष्ट्रीय स्तरावरील दोन दिवसीय IT FESTA 2025 चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्ये, सृजन शीलता आणि नवोन्मेषी कल्पना सादरकरण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता.
कार्यक्रमांतर्गत चार मुख्य स्पर्धा घेण्यात आल्या: IT क्विझ, पोस्टरसादरीकरण, सॉफ्टवेअर प्रदर्श, C++ प्रोग्रॅमिंग स्पर्धा. या चारही स्पर्धा मध्ये एकूण ५३५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## उद्योग प्रारंभ



मॅनेजमेंट विभागाच्यावतीने 08 मार्च 2025 ते 10 मार्च 2025 दरम्यान "उद्योग प्रारंभ – व्यावहारिक उद्योजकता"हा तीन दिवसीय क्षेत्रीय उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्येउद्योजकतेची कौशल्ये विकसित करणेहा होता.या उपक्रमात विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने बीज भांडवल (Seed Capital) देण्यात आले आणि त्यातून तीन दिवसांत कोणताही लघुउद्योग सुरू करण्याचे उद्दिष्ट दिले गेले. उपक्रमाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी आपलेअनुभव आणि अहवाल सादरकेले. या माध्यमातून विद्यार्थ्यांनीआर्थिक नियोजन, ग्राहकांचे वर्तन, विपणन धोरणे, विक्री कौशल्येआदी उद्योजकतेसाठी आवश्यक असलेल्या सर्व महत्त्वाच्या बाबी प्रत्यक्षात शिकल्या.

## Key to Success




विद्यार्थ्यांसाठी "Key to Success" या विषयावर एक अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. हे व्याख्यान सन्माननीय उद्योजक, रोटेरियन आणि समाजसेवक रोटेरियन हरिदास जी सोमानीयांनी दिले. या सत्राचा उद्देश विद्यार्थ्यांना वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासासाठी आवश्यक असलेली व्यावहारिक शहाणपण आणि मूल्ये समजावून देणे हा होता.



## कार्यशाळा : "लाईट, कॅमेरा, करिअर!"

"लाईट, कॅमेरा, करिअर" या नावाने विद्यार्थ्यांसाठी एक विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांना आधुनिक मुलाखतींच्या तंत्रांबाबत मार्गदर्शन करणे, विशेषतः व्हिडीओ इंटरव्ह्यूच्या तयारीसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे हा होता. विद्यार्थ्यांना कॅमेरासमोर आत्मविश्वासाने कसे बोलावे, आपली शारीरिक भाषा (बॉडी लँग्वेज) कशी प्रभावी ठेवावी, प्रश्नांची योग्य तयारी कशी करावी, याचे मार्गदर्शन करण्यात आले.कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून अनुभव देण्यात आला. योग्य पोशाख, पार्श्वभूमी, प्रकाशयोजना याबाबत देखील सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांनी स्वतःचे व्हिडीओ इंटरव्ह्यूज सादर करून त्यावर तज्ज्ञांनी अभिप्राय दिला.या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असून, त्यांना स्पर्धात्मक मुलाखतींसाठी प्रभावीपणे सादरीकरण करता येईल, असा विश्वास निर्माण झाला.





## Synergy 2025





"Synergy 2025" हेइन्स्टिट्यूटचे वार्षिक स्नेह संमेलन अत्यंत उत्साहात साजरे करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात ट्रॅडिशनल डे, ब्लॅक ॲण्ड व्हाईट डे, ट्विन्स डे आणि रेट्रो डे अशा थीम डेज सह झाली. विद्यार्थ्यांनी विविध पारंपरिक, क्लासिक आणि जुन्या आठवणी जागवणाऱ्या पोशाखांमधून सहभाग घेत वातावरणात रंगभरले. यानंतर फेस पेंटिंग, मेहंदी आर्ट, मॉकप्रेस कॉन्फरन्स, ॲडमॅडशो, सिंगिंग स्पर्धा, फॅशन शो, फूड कार्निव्हल, आणि मॉकपार्लमेंट यांसारख्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या सर्व स्पर्धा मध्ये विद्यार्थ्यांनी भरभरून सहभाग घेतला आणि आपली सर्जनशीलता व प्रतिभा सादर केली. कार्यक्रमाच्या विशेष आकर्षणा मध्ये माजी विद्यार्थी उपस्थिती महत्त्वाची ठरली. काही माजी विद्यार्थी स्पर्धांचे परीक्षण (जजिंग) करण्यासाठी उपस्थित होते, तसेच त्यांनी गेस्ट स्पीकर आणि बक्षीस वितरणाचे प्रमुख पाहुणे म्हणून भूमिका पारपाडली. त्यांच्या उपस्थितीने विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली व संस्थेशी नातं अधिक घट्टझालं. "Synergy 2025" हे स्नेहसंमेलन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकास, नेतृत्व, समूहकार्य, आणि सामाजिक संवाद कौशल्यांचा विकास करणारे आणि आठवणीत राहणारे ठरले.

## अंतरशालेय नाट्यस्पर्धा

सकाळ NIEयांच्या वतीने आयोजितअंतरशालेय नाट्यस्पर्धाही विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारी आणि नाट्यकलेचा विकास घडवणारी स्पर्धा ठरली. या स्पर्धेमध्ये विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि त्यांनी सामाजिक, शैक्षणिक तसेच संस्कृतिक विषयांवर आधारित नाटिका सादर केल्या.प्रत्येक नाट्यप्रयोगात विद्यार्थ्यांचे अभिनय, संवादफेक, सादरीकरण, मंच सजावट आणि टीमवर्क याचे उत्कृष्ट दर्शन घडले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्येस्वत:ला व्यक्त करण्याची क्षमता, संवाद कौशल्य, सांघिक भावना आणि आत्मविश्वासवाढीस लागला.




**MBA Course Vision:**
"To become a preferred Institute in the field of Management, to enhance value based education among the young aspirants".
**MBA Course Mission:**

- To develop the rural and urban students to be professionally competent.
- To inculcate values across all learning activities.
- To provide opportunities to showcase analytical skills and innovative thinking.
- To keep abreast students with changing global economy

### MBA Program Educational Objectives (PEO's)

| PEO | PEO Statements |
| --- | --- |
| PEO- 1 | Practice the management theories and concepts. |
| PEO- 2 | Acquire skills to handle decision making for achieving organizational goals |
| PEO- 3 | Imbibe values and ethics in the individual for organizational conduct. |
| PEO- 4 | To develop leadership qualities & handle Managerial Environment |